MHPU060006422018

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २१/०२/२०१८ |
| नोंदणी तारीख | : | २१/०२/२०१८ |
| निकाल तारीख | : | ०४/०७/२०२६ |
| कालावधी | : | ०८ ०४ १३ |
| | | वर्षे महिने दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी , लष्कर न्यायालय, पुणे यांचे न्यायालय**
**(पिठासीन अधिकारी — यो. सु. कवडे)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३५४/२०१८** **निशाणी क्र.**

**भारतीय दंड विधान, १८६० (संक्षिप्तेसाठी भा.दं.सं.) ची कलमे भा.दं.सं.ची कलमे ४४७ व ५०६ नुसार**

**फिर्यादी** : श्री. अरूण दिगंबर खोले
वय — ६५ वर्षे व्यवसाय — व्यापार
रा— फ्लॅट नं.१३, पार्क व्हीव सोसायटी,
पद्मजी पार्क, लेन नं.३, पुणे—४११३००२.

**फिर्यादी तर्फे विद्वान विधीज्ञ** : श्री. बी. एस. मुजफ्फर

**आरोपी** : १. श्रीमती फिलोमिना व्हीक्टर डिकूना
वय — ६५ वर्षे, धंदा — घरकाम

२. श्री.वेलेरियन व्हीक्टर डिकूना
वय — ४० वर्षे, धंदा — व्यापार

३. कुमारी इव्हीट व्हीक्टर डिकूना
वय — ३० वर्षे, धंदा — नोकरी
सर्व रा. ए—४/६, डिफेन्स कॉलनी,
साळूंखे विहार रोड, वानवडी, पुणे.

**आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ** श्री.व्ही. एम. शेजवळ

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | दि.०४/०२/२०१८ |
| तक्रार दिनांक | : | दि.२१/०२/२०१८ |
| तक्रार दाखल दिनांक | : | दि.२१/०२/२०१८ |
| दोषारोपाचा सारांश समजावल्याचा दिनांक | : | दि.२४/१०/२०१८ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | : | दि.२०/१२/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयाकरीता निश्चित केल्याचा दिनांक | : | दि.०४/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | : | दि.०४/०७/२०२६ |
| शिक्षेचा दिनांक व शिक्षा झाली असल्यास | : | निरंक |

**आरोपीचा तपशील —**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षेचा तपशील | कलम ४२८ फौ.प्र. संहितेच्या अनुषंगाने संपरीक्षे दरम्यान कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | श्रीमती फिलोमिना व्हीक्टर डिकूना<br>श्री. वेलेरियन व्हीक्टर डिकूना<br>कुमारी इव्हीट व्हीक्टर डिकूना | अटक नाही. | अभिलेखावर जामीनांचे दस्त आढळून येत नाही. | भा.दं.सं.ची कलमे ४४७ व ५०६ नुसार | निर्दोष | लागू नाही. | लागू नाही. |

**फिर्यादी/आरोपी/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी**

**अ) फिर्यादी पक्ष —**

| क्रमांक | नाव | निशानी क्रमांक | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|---|
| १. | अरूण दिगंबर खोले | ३७ | फिर्यादी |
| २. | फ्रांसीस डिकूना | ३८ | साक्षीदार |
| ३. | संजय दिगंबर खोले | ३९ | साक्षीदार |

**ब) आरोपीतर्फे साक्षीदार, असल्यास —**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| | ...निरंक.. | |

**क) न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यास —**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| | ...निरंक.. | |

**अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयाचे निशाणी क्रमांकाची यादी —**

**अ) अभियोगपक्ष —**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| | निरंक | |

**ब) आरोपी/बचाव पक्षाचे साक्षीदार —**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| | निरंक | |

**क) न्यायालयाचे साक्षीदार —**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| | .. निरंक.. | |

**ड) मुद्देमाल —**

| अ.क्र. | मालमत्ता | नोंदवही क्रमांक | तपशील |
|---|---|---|---|
| | निरंक | —— | —— |

## न्यायनिर्णय

**(उद्घोषणा दिनांक ०४ जुलै २०२६ )**

**थोडक्यात अभियोगपक्षाचे कथन पुढील प्रमाणे:—**

फिर्यादी अरूण दिगंबर खोले, रा. फ्लॅट नं.१३, पार्क व्हीव सोसायटी, पद्मजी पार्क, लेन नं.२ पुणे — ४११००२ (संक्षिप्ततेसाठी फिर्यादी) यांच्या मालकीची मिळकत क्र. ७६५, ताबुत स्ट्रीट, कॅम्प पुणे (संक्षिप्ततेसाठी वादग्रस्त मिळकत) असून त्यामध्ये मॅन्युअल एस. डिकोना हे भाडेकरू होते, त्यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा काही महिने तेथे राहिला व त्यानंतर तो सन २००६ मध्ये डिफेन्स कॉलनीमध्ये राहण्यास गेला, त्यानंतर सन

२०१२ मध्ये त्याठिकाणी त्यांचे निधन झाले. तेव्हापासून वादग्रस्त मिळकतीतील ते घर बंद होते व फिर्याद दाखल करण्याच्या एक वर्षापूर्वी ते पावसामुळे पडले.

**२.** फिर्याद दाखल करण्यापूर्वीच्या २० आधी फिर्यादी दुरूस्त करून घेत असलेल्या तळमजल्यावरील खोलीमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न आरोपींनी संगणमताने करून त्यांच्या परवानगीशिवाय मिळकतीमध्ये बदल करून घेतले, खोटी कागदपत्रे व प्रतिज्ञापत्र तयार करून वीजेसाठी मिटर घेतले, फिर्यादी यांना शिवीगाळ व धमक्या ते देत आहेत, अशा आशयाची फिर्याद दाखल झाल्यानंतर सुविद्य पूर्व पिठासीन अधिकारी यांनी फिर्यादीची पडताळणी करून आरोपीं विरूध्द भारतीय दंड संहीता, १८६० (संक्षिप्ततेसाठी भा.दं.सं.) ही कलमे ४४७, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांसाठी आदेशीका निर्गमित केली असे अभिलेखावरून दिसून येते.

**३.** अभिलेखावरून पुढे असे दिसून येते की, निशाणी क्र.१७ नुसार सुविद्य पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींना त्यांचे विरूध्द विरेचित अपराधाचा सारंश सांगितल्यानंतर आरोपींनी गुन्हा ना कबुल केला व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**४.** दोषारोप सिध्दतेसाठी फिर्यादी यांच्यातर्फे फिर्यादी (फि.सा.क्र. १) यांना निशाणी क्र.३७, आरोपी क्र.२ व ३ यांचे काका फ्रांसीस डिकूना (फि. सा.क्र.२) यांना निशाणी क्र. ३८ आणि फिर्यादी यांचे भाउ संजय दिगंबर खोले (फि.सा.क्र.३) यांना निशाणी क्र.३९ नुसार तपासण्यात आले. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ (i) (b) अन्वयेचे निवेदन निशाणी क्र. ४२ नुसार नोंदवण्यात आलेले आहे. त्यावरून त्यांना वादग्रस्त मिळकतीतून काढण्यासाठी खोटी दाखल केल्याचा त्यांचा बचाव असल्याची दिसून येते.

**५.** उपलब्ध सर्व पुराव्याचे अवलोकन केले. फिर्यादीतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. बी. एस. मुजफ्फर यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी फिर्यादीने आरोपींविरूध्दचे आरोप सिध्द केलेले असून आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा करण्यात यावी अशा आशयाचा युक्तीवाद पुराव्याचे वाचन करून केला.

६. आरोपींतर्फे निशाणी क्र.४८ नुसार लेखीयुक्तीवाद सादर करण्यात आलेला असून त्यामध्ये उलटतपासामधील उत्तरांवरून फिर्यादीमध्ये नमूद जागेमध्ये आरोपी भाडेकरू म्हणून राहत होते व त्यांच्या ताब्यामध्ये घर असल्याचे फिर्यादी यांच्यातर्फे मान्य करण्यात आलेले आहे, कोणत्या आरोपीने कोणत्या शिव्या दिल्या ते फिर्यादीमध्ये नमूद नाही, साक्षीदार क्र.२ हे आरोपींचे जवळचे नातेवाईक असून त्यांचे आरोपींच्या सोबतचे संबंध दुस—या कारणांमुळे बिघडलेले असून त्यांचे मिळकतीसंबंधी गोवा येथील न्यायालयात दिवाणी दावे प्रलंबित आहेत, त्यामुळे ते खोटी साक्ष देतात, साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये परस्परविरोधी कथने आहेत, अशा आशयाचा त्यांचा युक्तीवाद असल्याचे दिसून येते. त्यांनी आरोपींना निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली आहे.

७. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर परस्परविरोधी युक्तीवादांच्या पार्श्वभूमीवर पुढील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होतात. त्यावर कारणमिमांसेसह मी नोंदविलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०४/०२/२०१८ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या मालकीच्या घर मिळकत मालमत्ता क्र. ७६५, ताबुत स्ट्रीट, कॅम्प पुणे येथे आरोपींनी समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ अनाधिकृतरित्या बेकायदेशिररीत्या गृहअतिक्रमण केले व त्यायोगे आरोपी भा.दं.सं. चे कलम ४४७ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र आहेत असे फिर्यादीने सिद्ध केले आहे काय? | **........ नकारार्थी** |
| २. | उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ फिर्यादी यांना चिथावणी देण्याच्या उद्देशाने, त्यांच्याकडून अपराध घडवा किंवा सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्यांना शिवीगाळ केली व त्यायोगे आरोपी भा.दं.सं. चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र आहेत ही बाब फिर्यादीने सिध्द केली आहे काय? | **........ नकारार्थी** |
| ३. | अंतिम आदेश कोणता? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

**कारणमिमांसा**

८. आरोपींविरूध्द विरेचित दोषसिध्दीसाठी फिर्यादीने वादग्रस्त मिळकतीमध्ये आरोपींनी अनाधिकृतरित्या बेकायदेशिररीत्या गृहअतिक्रमण केले, त्यांना शिवीगाळ केली व या सर्व बाबी त्यांनी संगणमताने त्यांच्यातील समान उद्‌देशाच्या पुर:स्सरणार्थ केल्या असे फिर्यादी यांनी सिध्द करणे आवश्यक आहे.

**मुद्‌दा क्रमांक १ बाबत:—**

९. फिर्यादी यांच्या निशाणी क्र.३७ वरील तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांच्या सरतपासामध्ये आरोपींचे तळमजल्यावर असल्यामुळे तेवढा इमारतीचा उर्वरित भाग पावसामध्ये पडला तरी शिल्लक राहिला होता असे असलेले आहे. त्यापुढे सन २०१८ मध्ये संपुर्ण मुख्य स्ट्रक्चर उभे राहिल्यानंतरही आरोपींनी त्यांचा जो भाग कुलूप लावून ठेवला होता तो वेगळा होता असे त्यांच्या पुराव्यावरून दिसून येते. त्यांच्या उलटतपासादरम्यान त्यांना आरोपींनी ताबा दिला नव्हता, लघुवाद न्यायालय येथे त्यांच्या आरोपींविरूध्द दावा क्र.२३७/२०१८ हा प्रलंबित आहे, आरोपींच्या ताब्यातील वगळता इतर इमारतीच्या भागाच्या दुरूस्तीची परवानगी त्यांना मिळाली होती. याबाबी आरोपींचे सुविद्य विधीज्ञ यांनी अत्यंत कौशल्याने अभिलेखावर आणलेले दिसून येते. त्याचप्रमाणे आरोपींच्या ताब्यात वादग्रस्त मिळकतीपैकी काही भाग असल्याबाबत फिर्यादीमध्ये नमूद केलेले नसल्याचे फिर्यादीचे अवलोकन केले असता दिसून येते. उलटतपासादरम्यान ही बाब फिर्यादी यांनी मान्य केलेली आहे. या सर्व बाबींवरून असे दिसून येते की, वादग्रस्त मिळकतीपैकी ठराविक विशिष्ठ भाग आरोपींच्या ताब्यामध्ये होता. ही अत्यंत महत्वाची बाब फिर्यादी यांनी न्यायालयापासून सुरूवातील लपवली होती असे आढळून येते. फिर्यादी यांच्या अशा स्वरूपाच्या कृती व विसंगतीयुक्त कथनांमुळे फिर्यादी हे संपुर्णत: विश्वासार्ह साक्षीदार नाहीत असे अभिलेखावरून स्पष्ट होत आहे. त्यामुळे त्यांच्या पुराव्याला पुष्टी देणारा पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे.

१०. फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) यांच्या सरतपासामध्ये आरोपी क्र.१ या त्यांच्या भावाच्या पत्नी व उर्वरित आरोपी त्यांच्या त्या भावाची मुले आहेत असे आलेले आहे. आरोपींतर्फे नातेसंबंध विवादीत करण्यात आलेला नाही.

फिर्यादीतर्फे फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) हे घटनास्थळी योगायोगाने उपस्थित असणारे साक्षीदार म्हणून न्यायालयासमक्ष आणण्यात आलेले आहे असे दिसून येते. त्यामुळे भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम ७ नुसार फ्रान्सीस (फि.सा. क्र.२) यांच्या त्यादिवशी, त्याठिकाणी उपस्थितीचे कारण व प्रसंग हे भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम ५ नुसार सिध्द करणे या साक्षीदाराच्या पुराव्याच्या ग्राह्यतेसाठी फिर्यादीसाठी आवश्यक होते.

**११.** दिनांक ०४/०२/२०१८ रोजी फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) फिर्यादी यांना संध्याकाळी ०५.०० वाजता भेटायला गेल्याबाबत त्यांचा दावा असल्याचे दिसून येते. फिर्यादी यांचे निवासस्थान वादग्रस्त मिळकतीमध्ये नाही व ते पार्क व्हीव सोसायटी येथे आहे असे अभिलेखावर आलेले आहे. त्यामुळे त्यादिवशी, त्यावेळी फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) फिर्यादी यांना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी न जाता सरळ वादग्रस्त मिळकतीकडे कसे गेले याबाबत स्पष्टीकरण अभिलेखावर असणे आवश्यक होते. तसे स्पष्टीकरण अभिलेखावर नाही. त्याचप्रमाणे फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) यांना फिर्यादी वादग्रस्त मिळकतीजवळ किंवा वादग्रस्त मिळकतीमध्ये आहे हे नेमके कसे कळाले हे सुध्दा अभिलेखावर आणण्यात आलेले नाही. त्यामुळे फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) यांची त्यादिवशी, त्यावेळी तथाकथीत घटनास्थळी असणारी उपस्थीती याबाबत संशय निर्माण होतो.

**१२.** फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) यांचे संबंध आरोपींसोबत बिघडलेले असून गोवा येथील न्यायालयामध्ये त्यांचा आपसात दावा चालू असल्याचे फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) यांच्या उलटतपासादरम्यान आलेले आहे. यांच्या सरतपासादरम्यान त्यांचे भाउ व्हीक्टर यांनी त्यांना वेगळे राहण्यास भाग पाडून वादग्रस्त घराचा ताबा घेतला होता असे आलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या आई आणि पत्नीला त्यांचा तो भाउ मारत व त्रास देत असल्यामुळे ते वेगळे झाले होते असे त्यांनी सरतपासामध्ये सांगितलेले आहे. त्यांच्या अशा पुराव्यावरून त्यांची भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १२ नुसार संबध्द असणारी आरोपींबाबत वादातून निर्माण झाल्याची मानसिक स्थिती दिसून येते. त्यावरून असे जास्त संभाव्य दिसते की, आरोपींना शिक्षा होण्यात त्यांना रस आहे. या

सर्व कारणांस्तव ते प्रकरणाच्या निर्णयाशी प्रत्यक्ष हितसंबंध असणारे साक्षीदार आहेत हे स्पष्ट होते. काळजीपूर्वक त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांची तथाकथीत घटनेच्या दिवशी तथाकथीत घटनास्थळी उपस्थिती संशयाच्या पलीकडे जावून सिध्द झालेली नाही असे स्पष्ट होते. भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम ७ नुसार ही प्राथमिक बाब ज्यावर त्यांचा पुरावा अवलंबुन आहे तीच सिध्द झालेली नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या पुराव्यामध्ये असणा—या बाबींमुळे फिर्यादीच्या कथनांना पुष्टी मिळण्याऐवजी आरोपींचा वादग्रस्त मिळकतीमध्ये ताबा होता असे दिसून येते. त्यापुढे संजय (फि.सा.क्र.३) यांच्या सरतपासामध्ये वादग्रस्त मिळकतीवर पूर्वी असणा—या भाडेकरूचा ताबा आहे असे आलेले आहे. या सर्व कारणांस्तव वादग्रस्त मिळकतीवर आरोपींचा ताबा नव्हता व त्यांनी बेकादेशीर गृहअतिक्रमण केले असे दर्शविण्यासाठी आवश्यक असणारी बाब आरोपींचा ताबा नव्हता ही फिर्यादी यांनी सिध्द केलेली नाही असे दिसून येते. या कारणांस्तव या मुद्दयासाठी मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवतो.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत</u>**

**१३.** फिर्यादीचे अवलोकन केले असता त्यामध्ये दिनांक ०४/०२/२०१८ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजण्याच्या सुमारास आरोपींपैकी नेमके कोणी व नेमकी कोणत्या शब्दांमध्ये शिवीगाळ केली ते आढळून येत नाही. सुविद्य पूर्व पिठासीन अधिकारी यांनी दिनांक १८/०४/२०१८ रोजी नोंदवून घेतलेल्या पडताळणीमध्ये त्या नेमक्या बाबींचा उल्लेख आढळून येत नाही. त्याचप्रमाणे फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) त्यादिवशी, त्यावेळी व त्याठिकाणी हजर होते असा उल्लेख फिर्याद अथवा पडताळणीमध्ये नाही.

**१४.** संजय (फि.सा.क्र.३) हे फिर्यादी यांचे लहान भाउ असून त्यांचा सुध्दा वादग्रस्त मिळकतीमध्ये हिस्सा असल्याचे त्यांच्या पुराव्यावरून दिसून येते. त्यांच्या सरतपासादरम्यान आरोपींचे नांव अथवा तपशील आढळून येत नाही. त्यांच्या पुराव्यामध्ये सुध्दा नेमक्या कोणत्या आरोपीने, नेमक्या कोणत्या शब्दांमध्ये शिवीगाळ केली होती याबाबत उल्लेख नाही. त्यांच्या पुराव्यामध्ये नेमकी वेळ नमूद नाही. त्याचप्रमाणे ते साक्षीदार तथाकथीत घटनेच्या वेळी वादग्रस्त मिळकतीजवळ अथवा वादग्रस्त मिळकतीत हजर होते असा उल्लेख फिर्याद अथवा पडताळणीमध्ये दिसून येत नाही. या सर्व कारणांस्तव त्यांचा

पुरावा विश्वासार्ह आहे व फिर्यादी यांच्या पुराव्याला पुष्टी देतो असे म्हणता येणार नाही. ते तेथे उपस्थित होते अथवा त्यांनी तथाकथीत घटना पाहिली यांपैकी कुठलीही बाब फिर्यादी यांच्यातर्फे सिध्द होवू शकलेली नाही असे दिसून येते. या कारणांस्तव या मुद्दयासाठी मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवतो.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत</u>**

**१५.** आरोपींविरूध्द दोष निश्चीत करण्यात आलेले नसले तरीही फिर्यादी यांच्या पुराव्यामध्ये आरोपी क.२ यांनी त्यांना थोबाडीत मारल्याचे व आरोपी क्र.३ यांनी त्यांना ढकलून दिल्याचे आलेले असल्यामुळे पुराव्याचे त्याबाबत अवलोकन करणे आवश्यक दिसून येते. याबाबत फिर्याद अथवा पडताळणीमध्ये उल्लेख आढळून येत नाही. फ्रान्सीस (फि.सा.क्र.२) आणि संजय (फि.सा.क्र.३) या प्रकरणामध्ये हितसंबंध अथवा आरोपींना शिक्षा होण्यात रस असणा—या साक्षीदारांच्या पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता त्यांचा पुरावा विश्वासार्ह नाही असे आढळून आलेले आहे. अशा पार्श्वभूमीवर फिर्यादी यांनी न्यायालयात प्रथम सांगितलेली कथने सिध्द होवू शकले नाहीत असे दिसून येते. या कारणांस्तव मुद्दा क्र. १ व २ यांवरील निष्कर्ष लक्षात घेवून या मुद्दयाच्या उत्तरार्थ पुढील आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

**१)** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७६ (१) नुसार आरोपींची भारतीय दंड सहिता, भारतीय दंड संहिताची कलमे ४४७, ५०४ सह कलम ३४ नुसारच्या शिक्षेस पात्र अपराधांतुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२)** आरोपींची जमानतीचे व वैयक्तीक बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

**३)** आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ (१) नुसार अपील कालावधीसाठी जामीन बंधपत्रे सादर करावीत.

**(निकाल खुल्या न्यायालयात श्रृतलेखीत व उद्घोषीत करण्यात आला.)**

(सही) ४/७/२६

**(यो.सु.कवडे)**
न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग,
लष्कर न्यायालय, पुणे

पुणे
दि.०४/०७/२०२६